जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025
लोकमत

# 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे'चे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित उद्या, गुरुवारी डॉ. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' या पुस्तिकेचे प्रकाशन सरोज पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

मानव्यविद्या सभागृहात दुपारी ४ वाजता हा कार्यक्रम होणार असून, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, प्राचार्य. डॉ. टी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025

तरुण भारत

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' पुस्तिकेचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त २४ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात दुपारी ४ वाजता डॉ. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक उपेक्षित महात्मा' या पुस्तिकेचा प्रकाशन सरोज (माई) पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, प्राचार्य. डॉ. टी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. तरी सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025

सकाळ

# उद्या पुस्तक प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे गुरुवारी (ता. २४) डॉ. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' पुस्तिकेचे प्रकाशन होत आहे. सरोज पाटील यांच्या हस्ते मानव्यविद्या सभागृहात दुपारी चार वाजता प्रकाशन होईल. ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

23 APR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ ग्रंथालयात २ लाख ८६ हजार ५०५ पुस्तकांचा खजिना

## वाचनसंस्कृती वाढविण्यास हातभार; दुर्मीळ हस्तलिखिते, ब्रेल ग्रंथ, ई-जर्नल, डेटा-बेस यांचा समावेश

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

'वाचाल तर वाचाल' हा शब्दप्रयोग तंतोतंत खरा ठरविण्याचे मोलाचे कार्य शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राने केले आहे. ग्रंथालयात विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील २ लाख ८६ हजार ५०५ मुद्रित स्वरूपातील पुस्तकांचा खजिना उपलब्ध आहे. याचा उपयोग विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, स्पर्धा परीक्षार्थी यांच्यासह जगभरातील वाचकांना होत असून वाचनसंस्कृती वाढविण्यास हातभार लागत आहे.




२३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. २०२५ या वर्षातील जागतिक पुस्तक दिनाची संकल्पना 'रीड युवर वे' अशी आहे. बॅ. खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहितीची संसाधने असून यात २ लाख ८६ हजार ५०५ मुद्रित स्वरूपातील ग्रंथ उपलब्ध आहेत. यापैकी २ लाख ३५ हजार ९८३ वेगवेगळ्या शीर्षकाची पुस्तकांचा समावेश आहे. नियतकालिके विभागामध्ये ३८ हजार ६१५ पेक्षा जास्त मुद्रित स्वरूपातील जर्नलचे यापूर्वी प्रकाशित झालेले खंड उपलब्ध आहेत. विविध परदेशी नियतकालिकांबरोबरच १५ पेक्षा जास्त ई - डेटाबेसिस उपलब्ध आहेत.

भारत सरकार शिक्षण मंत्रालयाने १ जानेवारी २०२५ रोजी सुरू केलेल्या मवन नेशन, वन सबस्क्रीप्शनफयोजनेंतर्गत वेगवेगळ्या ३० प्रकाशकांकडून १३ हजार पेक्षा जास्त ई- जर्नलची उपलब्ध आहेत.

दुर्मीळ ग्रंथ विभागात ९ हजार १६३ हस्तलिखिते उपलब्ध असून १७१६ ते १९५० या कालावधीतील ५ हजारांपेक्षा जास्त दुर्मीळ ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध आहेत. संदर्भ ग्रंथ विभागांमध्ये सुमारे ७ हजार ९९ अहवाल व १२ हजार ३९० एम. फिल.व पीएच. डी. विषयांचे प्रबंध आहेत. अंध वाचकांसाठी ५९० ब्रेल स्वरूपातील ग्रंथ उपलब्ध आहे. ई-संसाधनांतर्गत १८६५ सीडीज व डीव्हीडीज तसेच १२७० ई- बुक्स, ४५३११ ई-जर्नल्स,१३ विदेशी जर्नल व १४ ई- डेटाबेसेस उपलब्ध आहेत.

### प्राचीन, पुरोगामी दुर्मीळ हस्तलिखिते

ग्रंथालयात वेदांत,धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, इतिहास, पुराण,साहित्य, काव्य, नाट्य, योगा इत्यादी विषयांवरील १३५३ पासूनची हस्तलिखिते उपलब्ध आहेत. यामध्ये गणेश महात्म्य शके १७१३, राजा तोडरमल लिखित आयुर्वेद सौख्य परिभाषा व आयुर्वेद सौख्य निदान चिकित्सा शके १७४१, शिळा प्रेस अथ रुक्मिणी स्वयंवर शके १७८३ , अथगृहशांती पद्धती, ज्ञानेश्वरी शके १४९०, दिन बंधू या दुर्मीळ वृत्तपत्राचे १८९३ ते १९१२ या कालावधीतील २९९ अंक भारतीय संविधानाची प्रत, हरिजन व अखंड भारत या दुर्मीळ नियतकालिकांचे अंक याचबरोबर माणगाव परिषद ६१ वा स्मृतिमहोत्सव विशेषांक यांचा समावेश आहे.

> कोल्हापूरच्या वाचनविषयक चळवळीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचा असणारा सहभाग महत्त्वाचा आहे. वाचकांना त्यांच्या माहिती विषयक गरजा पूर्ण करून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक ठरत आहे. वाचकांनी ज्ञानस्त्रोत केंद्राचा वापर निरंतर शिक्षण व ज्ञानग्रहण या दोन्ही गोष्टींसाठी करून घ्यावा. वाचन चळवळ यशस्वी करण्यामध्ये योगदान द्यावे.
>
> **- डी. बी. सुतार,** प्रभारी संचालक, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ

23 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक परिवर्तनासाठी ई-कंटेंट महत्त्वपूर्ण

## डॉ. देशमुख; विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २२ : 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. या बदलांचा प्रभावी भाग म्हणजे ई-कंटेंट विकसन आहे. विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविण्यासाठी ई-कंटेंट महत्त्वपूर्ण माध्यम ठरणार आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शरण साहित्य अध्ययनातर्फे आयोजित 'अध्ययन संसाधनासाठी ई-कंटेंट विकसन' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शरण साहित्य अध्ययन समन्वयक प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.

यावेळी डॉ. देशमुख म्हणाले, 'विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्याचे सामर्थ्य ई-कंटेंटमध्ये आहे. यूजीसीच्या स्वयंम व स्वयंप्रभा या प्लॅटफॉर्मवरून विविध अभ्यासक्रम उपलब्ध होत असून, हे उपक्रम ऑनलाईन शिक्षणाला नवे वळण देत आहेत.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या कार्यशाळेत बोलताना डॉ. एम. एस. देशमुख.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे महान व्यक्तींच्या जीवनकार्यावर आधारित अभ्यासक्रमांचे ई-कंटेंट तयार केले जात आहेत. हा उपक्रम भारतीय ज्ञान प्रणालीचा भाग असून, भारतीय विचारविश्वाचा जागतिक प्रसार यामुळे साध्य होईल.'

डॉ. करेकट्टी म्हणाल्या, 'महान व्यक्तींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी ई-कंटेंट हे प्रभावी माध्यम ठरणार आहे.'

यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, डॉ. नलिनी वाघमारे, भीमराव पाटील, चन्नावीर भद्रेश्वरनाथ, एम. ई. तंगावर, अरुण शिंदे, यश आंबोळे आदी उपस्थित होते. दूरशिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. के. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. संजय चोपडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025

सकाळ

# तंत्रज्ञान अधिविभागामध्ये 'टेक्नोसिस' स्पर्धा उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे 'टेक्नोसिस २०२५' या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेचे रसायन अभियांत्रिकी शाखेत आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्घाटनासाठी रेमंड कॉटन इंडस्ट्रीचे वर्क्सचे प्रमुख दीपककुमर गुप्ता, तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर उपस्थित होते.

गुप्ता म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी ध्येय, ज्ञान आणि अथक परिश्रम ही यशस्वी होण्याची त्रिसूत्री आहे. शाश्वत विकासासाठी इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल, यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे.' डॉ. कोळेकर म्हणाले, 'शाश्वत विकास आणि त्यादृष्टीने तंत्रज्ञानाची वाटचाल असली पाहिजे.'

स्पर्धेचे समन्वयक श्रीपाल गायकवाड यांनी विविध महाविद्यालयांच्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट मॉडेल, क्विझ, आयपीएलऑक्शन, गेमिंग, फूड स्टॉल स्पर्धेत सहभाग घेतल्याची माहिती दिली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी रासायनिक अभियांत्रिकीचे समन्वयक प्रा. डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते. डॉ. डी. एम. नांगरे, डॉ. ए. बी. मडावी, डॉ. प्रशांत पाटील, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, निकिता दिंडे आणि रासायनिक अभियांत्रिकेच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. अरिबा पटेल, पायल पाटील या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. प्रज्ञा जगताप हिने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ८६,०३३ विद्यार्थी

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ८६ हजार ३३ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेदरम्यान सोमवारी ५६ गैरप्रकार उघडकीस आले आहेत. मंगळवारी बीए., बी.कॉम., बीएस्सी., बीसीए., बीए.बीएड., बीआयडी, एमएड., एमबीए., बीडीएफसी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन आदी ७८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १६८ केंद्रांवर झाल्या. दरम्यान, दि. २१ रोजी एम.फार्मसीच्या विविध सत्रांचे निकाल घोषित केले. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025
लोकमत

# तंत्रज्ञान अधिविभागात 'टेक्नोसिस' राष्ट्रस्तरीय स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीत आयोजित टेक्नोसिस २०२५ ही राष्ट्रस्तरीय स्पर्धा उत्साहात पार पडली. रेमंड कॉटन इंडस्ट्रीचे वर्क्स हेड दीपककुमार गुप्ता यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर अध्यक्षस्थानी होते.

दीपककुमार गुप्ता म्हणाले, ध्येय, ज्ञान व अथक परिश्रम ही यशस्वी होण्याची त्रिसूत्री आहे. शाश्वत विकासासाठी इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे. डॉ. ए.बी .कोळेकर यांनी शाश्वत विकास व त्या दृष्टीने तंत्रज्ञानाची वाटचाल असली पाहिजे, असे सांगितले.

स्पर्धेचे समन्वयक श्रीपाल गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. अरिबा पटेल, पायल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रज्ञा जगताप हिने आभार मानले.

यावेळी प्रा. डॉ. पी. डी. पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. डी. एम. नांगरे, डॉ. ए. बी. मडावी, डॉ. प्रशांत पाटील, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, निकिता दिंडे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2025

तरुण भारत

# एम फार्मसी परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम फार्मसी सेमिस्टर एक व सेमिस्टर दोन या दोन परीक्षांचे निकाल जाहीर झाले.



मार्च/एप्रिल–२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बी. ए., बी. कॉम., बीएसस्सी, बीसीए, बीलिप, बीएड्, बीएबीएड, एमलिप, बीबीए, एमबीए, जर्नालिझम, लॉ, अशा ७८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. १६८ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. ही परीक्षा ८६ हजार ३३ विद्यार्थ्यांनी दिली.

भरारी पथकाकडून कोल्हापूर ३८, सांगली १६ आणि सातारा २ अशा ५६ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे केली आहे. या विद्यार्थ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधिन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.